**<u>नियमित दरखास्त क्र. १७/२०१२ मधील नि. २१, ४१ व ४२ वरील आदेश</u>**

सामनेवाला क्र. १ हा दि. १३/०१/२०१३ रोजी मयत झाला असून त्याचे वारस पटलावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यासाठी, तसेच प्रकरण अवसान पावलेबाबतचा आदेश रद्द होण्यासाठी व सामनेवाला क्र. १ चे वारस पटलावर घेण्यास परवानगी मिळावी यासाठी सदरचे अर्ज आहेत. दरखास्तदाराचे असे कथन आहे की दरखास्तदार ८५ वर्षे वयाची वृध्द आहे. ती सतत आजारी असते. त्यामुळे तिला मुदतीत अर्ज दाखल करता आले नाहीत. त्यामुळे झालेला विलंब माफ करुन अर्ज मंजूर करावेत.

०२. सदरच्या अर्जांना सामनेवालाचे वारस अ व ब यांनी म्हणणे दिले आहे. अन्य वारसांनी म्हणणे दिलेले नाही. सामनेवालाचे वारस अ व ब यांचे असे कथन आहे की अर्ज बेकायदेशीर आहे. एकदा प्रकरण अवसान पावल्याचा आदेश झाल्यावर तो रद्द करता येणार नाही. अर्जातील कारणे चुकीची आहेत. मयत झालेली व्यक्ती हा दरखास्तदाराचा मुलगा होता. त्यामुळे त्याच्या मृत्यूची व वारसांची माहिती दरखास्तदाराला होती. दरखास्तदार आजारी असल्याबाबतचा पुरावा दिलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करावा.

०३. दरखास्तदारतर्फे वकिलांना युक्तीवाद ऐकला. सामनेवालाचे वारस अ व ब गैरहजर होते. प्रस्तुतची दरखास्त ही वाटपाच्या दाव्याच्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. अन्यथा उभय पक्षकारांचे नुकसान होईल. सबब तिनही अर्ज मंजूर करण्यात येत आहेत. खर्चाबद्दल आदेश नाही. तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. त्यानंतर सामनेवाला क्र. १ च्या सर्व वारसांना दरखास्तीच्या नोटीसा काढण्यात याव्यात. सदर आदेशाच्या प्रती प्रत्येक अर्जाला लावण्यात याव्यात.

सही/—

(संतोष द. चव्हाण )

दि. ०९/१०/२०१५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.